**महाराष्ट्र शासन**

क्रमांक :जशिअ-२०१७/प्र.क्र.४१५/जल-७
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
दिनांक ४.८.२०१७

प्रति,
**विभागीय आयुक्त (सर्व)**
**जिल्हाधिकारी (सर्व)**

विषयः- जलयुक्त शिवार अभियान सन २०१७-१८ या वर्षात निवडण्यात आलेल्या गावांचे आराखडे तयार करणेबाबत व अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना.

जलयुक्त शिवार अभियान या महत्वाकांक्षी कार्यक्रमाची सन २०१५-१६ पासून राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. सन २०१७-१८ च्या कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी:-

१. सन २०१७-१८ चा आराखडा तयार करताना शासन स्तरावरुन निर्गमित केलेल्या सूचनांनुसार करण्यात यावा. या सूचनांचा तपशील खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | शासनाचे पत्र/परिपत्रक/शासन निर्णय क्रमांक व दिनांक | निर्गमित सूचना |
|---|---|---|
| १ | शासन पत्र क्रमांक:- जशिअ-२०१७/प्र.क्र. २४७/जल-७, दि. १६ मे, २०१७ | जलयुक्त शिवार अभियानाचे आराखडे तयार करताना प्रत्येक स्तरावर (गाव, तालुका, जिल्हा) यथार्थदर्शी आराखडयानुसार यापुर्वी पाणलोटात झालेली कामे विचारात घेणे, जुन्या अस्तितत्वात असलेल्या कामांची उपयुक्तता |

| | | |
|---|---|---|
| | | कमी झाली असल्यास दुरूस्ती प्रस्तावित करणे इ. बाबींची पडताळणी करून सन २०१६-१७ चे आराखडे तपासुन सुधारीत करणे व सन २०१७-१८ चे आराखडे या सूचना विचारात घेवुनच तयार करणे. |
| २ | शासन पत्र क्रमांक :- जशिअ- २०१७/प्र.क्र. २३३/जल-७, दि. २० मे, २०१७. | जलयुक्त शिवार अभियान व जलसंधारणाची अन्य कामे करतांना सर्व यंत्रणांनी मृद व जलसंधारणाची कामे मजुरांच्या सहाय्याने करण्याबाबत जलसंधारण विभागाने निर्गमित केलेले दि. १० ऑक्टोबर, २०१३ व मशीनद्वारे कामे करण्याबाबत निर्गमित केलेले दि. १५ ऑक्टोबर, २०१३ नुसार आर्थिक मापदंडाचाच अवलंब करण्याबाबत. |
| ३. | शासन पत्र क्रमांक:-जशिअ-२०१७/प्र.क्र.२४८/जल-७, दि. २० मे, २०१७. | जलसंधारण विभागातंर्गत सिमेंट नाला बांध व इतर जलसंधारणाच्या कामांच्या अंदाजपत्रकीय दर पृथ्थकरणासाठी जलसंपदा विभागाची सन २०१३-१४ ची दरसूची वापरण्यात यावी. |
| ४. | शासन पत्र क्रमांक :- जल-७/२०१७, दि. २३ मे, २०१७. | मातीची होणारी धुप थांबविणे व नाल्यामध्ये गाळ जमा होऊ नये याकरीता गाव आराखडयातील क्षेत्र उपचाराची कामे (Area Treatment) ची कामे ७०% पूर्ण झाल्यानंतर सिमेंट नाला बांधचे कामे हाती घेण्याबाबत. |
| ५. | शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग, क्र. सासिब-२०१४/प्र.क्र.२०९/जल-७, दि. २३ जुन, २०१७ | सिमेंट कॉक्रीट नाला बांधाच्या भौतिक व आर्थिक मापदंडाबाबत मार्गदर्शक सूचना. |
| ६. | शासन पत्र क्र.:जशिअ-२०१७/प्र.क्र.३२२/जल-७, दि.२९ जुन,२०१७ | जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत सन २०१७-१८ या वर्षी निवडलेल्या गावामधील कृती आराखडा करताना कामांचा प्राधान्यक्रम ठरविण्याबाबत.<br>१.दुरुस्ती + क्षेत्र उपचार + लोकसहभाग प्रमाण किमान ७० % पेक्षा कमी होणार नाही |

| | | |
|---|---|---|
| | | व<br>२.सिमेंट नाला बांध + को.प.बंधारा कामे प्रमाण कमाल ३०% पेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत. |
| ७. | शासन पत्र क्र : जशिअ २०१७/प्र.क्र.३७१/जल-७, दि. १३ जुलै, २०१७. | सन २०१७-१८ या वर्षाकरिता निवडयात आलेल्या गावातील कामकाजाचे नियोजन करण्याकरिता कालबध्द कार्यक्रमानुसार कार्यवाही करण्याबाबत. |
| ८. | शासन पत्र क्र : जशिअ-२०१७/प्र.क्र.३५० (भाग-१)/जल-७, दि. २४ जुलै, २०१७.<br><br>कृषि आयुक्तालय जावक क्र : मृदसं/जलयुक्त शिवार अभियान/प्रशिक्षण/मृद-२/१३२९, दि. २७/७/२०१७ | जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत सन २०१७-१८ या वर्षासाठी निवडलेल्या गावांमधील पाणलोट प्रेकल्प आराखडा तयार करणे व अंमलबजावणी अनुषंगाने निवडलेल्या गावातील अशासकीय सदस्य -३ (सरपंच, महिला प्रतिनिधी, ग्राम कार्यकर्ता/ शेती मित्र/जलसेवक/प्रगतीशील शेतकरी/पुरस्कार प्राप्त शेतकरी यामधून) व गावाशी संबंधित शासकीय क्षेत्रीय कर्मचारी-२ (कृषि सहाय्यक व ग्राम सेवक) असे एकूण ५ प्रशिक्षणार्थी प्रती गांव यांचे ३ दिवस कालावधीचे निवासी प्रशिक्षण आयोजित करण्याबाबत प्रशिक्षणाच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याबाबत. |
| ९. | कृषि आयुक्तालय जावक क्र : मृदसं/जशिअ/मृद-२/१४०३, दि. २/८/२०१७ | संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कार्यालयाच्या स्तरावरुन ग्रामस्तरीय पाणलोट विकास आराखडयामध्ये पाण्याचे अंदाजपत्रक तयार करणेबाबत निर्गमित मार्गदर्शक सूचना. |
| १०. | कृषि आयुक्त जावक क्र. मृदसं/जशिअ/मृद-२/१४४४, दि. ३/८/२०१७ | संचालक, मृदसंधारण, पुणे यांनी निर्गमित केलेल्या उपचार क्षमता नकाशा (Treatment Potential Map) बाबतच्या मार्गदर्शक सूचना. |

२. सन २०१७-१८ मध्ये जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवडण्यात आलेल्या गावातील ५ प्रतिनिधींचे पायाभूत प्रशिक्षण संस्थेमार्फत आयोजित

करणेबाबत यापूर्वी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. हे प्रशिक्षण दिनांक १५ सप्टेंबर पूर्वी घेण्यात यावे.

३. MRSAC व GSDA यांचेकडील अद्ययावत तंत्रज्ञान वापरुन प्रत्येक गावाचे गावनिहाय उपचार क्षमता नकाशे (Treatment Potential Map) दिनांक १५ ऑगस्ट,२०१७ पूर्वी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. त्याआधारे आराखडे तयार करण्यात यावेत.

४. पाणलोट विकासाबाबत प्रशिक्षण सत्रात मिळालेली तांत्रिक माहिती, उपचार क्षमता नकाशे व शिवार फेरीतील वस्तुनिष्ठ शेतपरिस्थिती विचारात घेवून आराखडे तयार करण्यात यावेत.

५. आराखडे तयार करतांना गाव घटकाऐवजी गावपाणलोट हा घटक विचारात घ्यावा. गावाच्या क्षेत्राची विभागणी सर्वसाधारणपणे एक किंवा त्यापेक्षा अधिक सुक्ष्म पाणलोटामध्ये ( Micro Watershed) होते. गावाच्या हद्दीबाहेरील सुक्ष्म पाणलोटामधून पाणी येत असल्यास त्या क्षेत्राचा भाग गावाच्या भागास ग्राहय धरुन आराखडा तयार करावा. गाव पाणलोट हा गाव नकाशाशी कांही ठिकोणी मिळता जुळता नसेल व पाणलोटाचा माथ्याकडील कांही भाग गाव नकाशाचे (Village Map) बाहेर असेल अशा ठिकाणी माथ्याकडील पाणलोटाच्या भागाचा आराखड्यात समावेश करण्यात यावा. उपचार क्षमता नकाशामध्ये पाणलोटाच्या सीमा स्पष्टपणे दर्शविलेल्या आहेत. माथा ते पायथा (Ridge to Valley) या तत्वानुसार गावनकाशामध्ये पाणलोट क्षेत्र (Watershed) पूर्णपणे येत नसेल अशा ठिकाणी पाणलोटाचा गाव नकाशा बाहेरील माथ्याकडील पूर्ण भाग आराखडयात घेण्यात यावा. हे घेण्यात आलेले क्षेत्र दुसऱ्या गाव नकाशातील /शिवारातील असू शकेल. एकात्मिक पाणलोट विकासाकरिता हे गाव नकाशाबाहेरील वाढीव क्षेत्र गाव आराखडा करताना त्यामध्ये समाविष्ठ करुन त्या क्षेत्रावर मृद व जलसंधारणाचे उपचार घेण्यात यावेत. पाण्याचा ताळेबंद करताना हे क्षेत्र दुसऱ्या गावातील असले तरी ते विचारात घेण्यात यावे. अशा प्रकारच्या क्षेत्रावर उपचारांची द्विरुक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६. गाव आराखड्यामध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात येऊन समग्र आराखडा (Net Planning) करण्यात यावा.

| | |
|---|---|
| भाग-१ | गावाची पायाभूत माहिती |
| भाग-२ | गावाच्या पाणलोटातील पाण्याचा ताळेबंद |
| भाग-३ | शासन निर्णय दि. ५ डिसेंबर, २०१४ मधील परिशिष्ट-क त्याचा गोषवारा. |
| भाग-४ | उपचार क्षमता नकाशा (Treatment Potential Map ) |
| भाग-५ | उपचारांचे संक्षिप्त अंदाजपत्रक (Block Estimate) |

वरीलप्रमाणे गाव आराखडा तयार करुन तो पुस्तक स्वरुपात (spiral Binding) पाच (५) प्रतीमध्ये करण्यात यावा.

७. शासन पत्र दिनांक १३ जुलै,२०१७ अन्वये २०१७-१८ या वर्षासाठी निवड करण्यात आलेल्या गावासंदर्भात नियोजन-कालबध्द कार्यक्रम यापूर्वीच निश्चित करण्यात आलेला आहे. त्याच्या अधिन राहून अंमलबजावणी करण्यात यावी.

८. मागील दोन वर्षाचा अनुभव विचारात घेता गावाच्या पाणलोट आराखड्याचे प्रकल्प मूल्य सर्वसाधारणपणे रुपये ६० लाख इतके येते. तथापि, यामध्ये गावाच्या धारण क्षेत्रानुसार बदल होवू शकतो. प्रकल्प मूल्य रुपये ६० लाखापेक्षा अधिक रक्कमेच्या गाव आराखड्याची जिल्हा स्तरीय समितीने बाबनिहाय काळजीपूर्वक तपासणी करावी.

९. गाव आराखडे तयार करतांना जलपरिपूर्ण (Water Neutral) हा निकष ठेवावा, म्हणजेच गावाची एकूण पाण्याची लागणारी गरज आणि त्याची उपलब्धता होण्यासाठी आवश्यक उपचार आराखड्यामध्ये प्रस्तावित करण्यात यावेत.

१०. दुरुस्ती संदर्भात लवकरच दुरुस्तीचे मापदंड निश्चित करण्यात येत आहेत. त्यामुळे अशा दुरुस्तीच्या कामाच्या अंदाजपत्रकांना मापदंड निश्चित केल्यानंतर, त्यानुसार मान्यता देण्यात यावी.

११. ज्या ठिकाणी यापूर्वीच आराखडे तयार करण्याच्या कामास सुरवात झालेली आहे. अशा ठिकाणी उपरोक्त सूचनाप्रमाणे गावाचे सुधारित आराखडे तयार करण्यात यावेत.

१२.वरीलप्रमाणे आराखडे तयार झाल्यानंतर गावाचा समग्र आराखड्याला (Net Planning) जिल्हा स्तरीय समितीची मान्यता घ्यावी. जिल्हा स्तरीय समितीच्या मान्यतेनंतर विभागस्तरीय समितीकडे मान्यतेस्तव सादर करावा. जिल्हा स्तरीय समितीने समग्र आराखड्याला (Net Planning) मान्यता दिल्यानंतर सविस्तर अंदाजपत्रके (Detailed Estimate) तयार करुन त्यास सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक मान्यता घ्यावी. जलयुक्त शिवार अभियानामध्ये वेगवेगळया स्त्रोतामधून निधी उपलब्ध होत असल्यामुळे निधी स्त्रोतनिहाय सक्षम प्राधिकाऱ्याची प्रशासकीय मान्यता घ्यावी.

१३.दिनांक १३ जुलै,२०१७ च्या निर्गमित परिपत्रकान्वये निश्चित केलेल्या कालबध्द कार्यक्रमानुसार निविदा प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी.

सन २०१७-१८ या वर्षाकरिता निवडलेल्या गावामध्ये अभियान यशस्वीरित्या राबविण्यासाठी वरील प्रमाणे सूचनांची अंमबजावणी करण्यात यावी.

५।१८

( एकनाथ डवले )
सचिव (जलसंधारण व रोजगार हमी योजना)